# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

झो.पु.प्रा निश्चयेन परिवर्तनम्। झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

३३
१८/०१/२०२४

जा.क्र. झोपुप्रा/प्रस्ताव/ १८८ /२०२४

दिनांक :- १८/०१/२०२४

## आदेश

विषय :- सि.स.नं. ९६०, ९६२, ९६३ व अण्णाभाऊ साठे वसाहत, ९६४ भवानी पेठ, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत.

विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. वेस्टीन डेव्हलपर्स प्रा. लि. यांनी वास्तुविशारद मे. प्राईड अमन असोसिएट्स यांच्यामार्फत संदर्भ क्र. १ अन्वये या कार्यालयाकडे दाखल केला होता, व त्यानुसार सक्षम प्राधिकारी विभागामार्फत सदर भूखंडातील झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) दि. ०७/१०/२०१४ रोजी निश्चित करणेत आलेली आहे. (सि.स.नं. ९६३ वगळुन)

सदरचा प्रस्ताव प्रलंबित असताना मे. वेस्ट इन (हॅबिटेट प्रा. लि. (पूर्वाश्रमीचे वेस्टीन डेव्हलपर्स प्रा. ली.) यांनी सदर प्रकरणातील खजगी जमीनीचे मालकी हक्क खरेदीखताद्वारे विकसक मे. प्राईड अमन असोसिएट्स यांना हस्तांतरीत केल्याचे दि. १०/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. मे. प्राईड अमन असोसिएट्स यांनी लगतच्या मिळकतीवरील सि.स.नं. ९६३ या मालमत्तेचा समावेश नव्याने योजनेत समावेश केल्यानंतर योजनेतील समाविष्ट मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मालमत्ता क्रमांक | क्षेत्र चौ.मी. | मालकीचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | सि.स.नं. ९६० | ४५.१० चौ.मी. | मे. प्राईड अमन असोसिएट्स खरेदीखताद्वारे हवेली ११अ क्र. १७७९४/२०२३ दि. ०७/०८/२०२३ रोजी नोंदणीकृत. |
| २ | सि.स.नं. ९६३ | ९७ चौ.मी. | मे. प्राईड अमन असोसिएट्स खरेदीखताद्वारे हवेली नं. ११ अ.क्र. १७७९५/२०२३. |
| ३ | सि.स.नं. ९६४ | ८६.१०चौ.मी | मे. प्राईड अमन असोसिएट्स खरेदीखताद्वारे हवेली नं. ११ अ.क्र. १७७९३/२०२३. |
| ४ | सि.स.नं. ९६२ | ४७१.६० चौ.मी | सरकारी |
| एकूण योजनाक्षेत्र | | ६९९.८० चौ.मी | |

सदर भूखंडातील सि.स.नं. ९६२ हा सरकारी मालकीचा असल्याने ४७१.६० चौ.मी. क्षेत्राकरीता मा. जिल्हाधिकारी यांचे दि. २१/०५/२०१० रोजीच्या पत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी परवानगी दिलेली आहे.

मे. प्राईड अमन असोसिएट्स यांनी सदर प्रकरणी ७७ झोपडीधारकांपैकी ६३ झोपडीधारकांचे संमती त्यांची फर्म मे. प्राईड अमन असोसिएट्स यांचे नावे घेऊन सादर केली आहे.

सदर योजनेमधील सि.स.नं. ९६२ ही मिळकत शासकीय असुन सि.स.नं. ९६०, ९६३ व ९६४ ही मिळकत खाजगी असल्याने याबाबत पुणे मनपा यांचेकडून झोपडपट्टी सदृश्य अहवाल प्राप्त झालेला आहे.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी दि. ११/१२/२०२३ रोजी पुणे महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी मालकीच्या मिळकतीवरील बांधकामे झोपडपट्टी सदृश्य अहवाल पाठविण्यात आलेले आहेत, परंतु झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून अद्याप प्रस्ताव मान्य करणेत आलेले नाही, असे सर्व प्रस्ताव स्थगित करणेत यावेत, असे कळवले आहे.

सबब सि.स.नं. ९६२ मधील शसकीय जमिनीचे क्षेत्रा संदर्भात झो.पु.योजना दाखल करून घेण्यात येत असून उर्वरित सि.स.नं. ९६०, ९६३ व ९६४ क्षेत्रावरील झोपडीधारकांच्या पुनर्वसन योजनेसंदर्भात स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

अटी व शर्ती :-

१. दाखल केलेल्या योजनामधील झोपडीधारकांची पात्रता निश्चित झाल्यानंतर तसेच अपात्र व्यक्तींच्या बाबतीत अपिलाद्वारे ते पात्र ठरल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनाची जबाबतदारी घेऊन योजनेच्या प्रशासकीय मान्यतेसाठी रेखांकन व आराखडे सादर करणे बंधनकारक राहील.

२. योजनाच्या अंमलबजावणीसाठी / बांधकामासाठी आवश्यक अशा सर्व प्रकारच्या नाहरकत प्रमाणपत्रामधील अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३. योजनेबद्दल / योजनेमध्ये समाविष्ट जमिनीच्या बाबतीत / योजनेमध्ये समाविष्ट झोपडीधारकांच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयाने दिलेले आदेश / मनाई आदेश याचे पालन करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक असेल.

४. प्रस्ताव दाखल करुन घेतल्यानंतर १ वर्षाच्या आत पात्रता यादी अंतिम करुन योजनांचे आराखडे व बांधकाम नकाशे सादर करुन प्रशासकीय मान्यता घेणे अर्जदारास बंधनकारक असेल.

५. प्रकल्पाची अंमलबजावणी करताना किंवा बांधकाम करताना शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले नियम, महानगरपालिकेचे नियम व विनियम, पाटबंधारे विभाग, पुरातत्व विभाग, वातावरण, पर्यावरण, आरोग्य व सार्वजनिक शांतता व सुरक्षितता याबाबतचे कायदे, महाराष्ट्र नगर रचना कायदा, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्याखालील नियम यामधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.